REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# ‘शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांची अध्ययन शैली, शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांचा शैक्षणिक संपादना संदर्भात तुलनात्मक अभ्यास’

डॉ . जगताप मनिषा वसंतराव
सहा . प्राध्या : आयडीयल विभाग,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ,जि . जळगाव .

## 1.1 प्रस्तावना ः



मानवी जीवन हे गतीमान आहे ,विकसित होणारे आहे . स्थूलमानाने हा विकास शिक्षणातून होतो असे मानले जाते . शिक्षण म्हणजे संस्कृती, मूल्यसंस्कार, ज्ञान,कौशल्ये आत्मसात करणे . शिक्षण ही आमरण चालणारी प्रकिया आहे . एखादा शिल्पकार मोठया शिळेतून जसे शिल्प साकार करतो . तसेच प्रत्येक व्यक्तीत विविध गुण असतातच . ते शिक्षणाच्या माध्यमातून प्रकट होतात व त्यांचा विकास होतो . सभोवतालच्या वातावरणाला अनुलक्षून जाणिवपूर्वक स्वतःच्या वर्तनात घडवून आणलेले टिकाऊ स्वरूपाचे बदल होण्याची प्रक्रिया म्हणजे अध्ययन होय . अध्ययन हे चांगल्यारितीने घडून येणे हे अनेक घटकांवर अवलंबून असते . जसे वय, लिंग ,बुद्धिमत्ता, संपादन ,गरजा ,प्रेरके ,कौशल्ये इत्यादी . ज्ञान आत्मसात करण्याची शैली व्यक्तीनुसार वेगवेगळी असते . घडणा-या घटनांना प्रतिसाद देण्याच्या प्रत्येकाच्या क्षमता विविध असतात . हया सर्व प्रकियांसाठी शिक्षण आपल्याला खूप मदत करते . शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या आंतरिक शक्तींचा नैसर्गिक समतोल व गतीमान विकास होय . म्हणून शिक्षण हे मानवी जीवनाचे आवश्यक अंग असुन त्याद्वारा नवनवीन ज्ञान व्यक्ती आत्मसात करत असते .

तसेच आपल्या जीवनात अनुभवाला भावनिक बाजू असते . एखादे पुस्तक वाचायला आवडते,तर दुसरे एखादे पुस्तक वाचायला प्रेरणादायी ठरत नाही म्हणून लगेचच बाजुला ठेवतो . व संबंधित पुस्तकातून काही ज्ञान मिळत नाही असे म्हणतो . म्हणजे या पैलूतूनच आपली एखादया गोष्टीकडे बघण्याची अभिवृत्ती तयार होते . अभिवृत्ती हया माणसाच्या वर्तनाचे नियंत्रण करतात . विशिष्ट प्रसंगात विशिष्ट प्रकारे वागण्याची तयारी अभिवृत्तीमुळेच होते . त्यामुळे वर्तनाला विशिष्ट वळण लागते . शिक्षण ,संगित, चित्रकला ,खेळ, दैनंदिन घडणा-या घडामोडी इत्यादी संबंधी आपले काही अनुकूल किंवा प्रतिकूल ग्रह असतात . त्यादृष्टिने आपल्या प्रतिकिया अभिवृत्तीवर अवलंबून असतात . काही संशोधनातून असे आढळले आहे की व्यक्तीची अध्ययन शैली व एखादया गोष्टीकडे बघण्याची अभिवृत्ती यामुळे शैक्षणिक संपादनही विविधांगी असते . यासाठी एक पथदर्शक अभ्यास केला त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे .

## 1.2 समस्येचे स्पष्टीकरण

### अध्ययन शैली संकल्पना (Concept Of Learning Style) :

अध्ययन शैली हा दोन शब्दांनी तयार झालेला आहे . अध्ययन + शैली . **अध्ययन** ही जन्मापासून मृत्यूपर्यंत चालणारी अखंड प्रक्रिया आहे . ती औपचारिक व अनौपचारिक पद्धतींनी घडून येते . थोडक्यात अध्ययन म्हणजे वर्तन परिवर्तन होय . वेगवेगळया मानसशास्त्रज्ञांनी अध्ययनाच्या व्याख्या केल्या आहेत . जसे

- **गेटस-**अध्ययन म्हणजे अनुभवाद्वारे वर्तनात बदल घडवून आणणे होय .

➢ **क्रो व क्रो-**अध्ययन म्हणजे ज्ञान ,सवयी व वृत्ती यांचे संपादन होय .


तसेच **शैली** म्हणजे काम करण्याची, अध्ययन करण्याची विशिष्ट पद्धत होय .

व्यक्तीगत फरक लक्षात घेता घडणा-या घटनांना व्यक्ती किती वेळात कोणत्या पद्धतीने प्रतिसाद देतो त्याच्या हया वैशिष्ट्यालाच शैली म्हणतात . तसेच अभ्यासातून व अनुभवातून ज्ञान, कौशल्ये प्राप्त करण्याची वैशिष्ट्यपूर्ण सवय म्हणजे अध्ययन शैली होय . जीवनात येणा-या विविध समस्या तसेच अनुभव यांना सामोरे जाऊन त्यातून योग्य मार्ग काढण्याच्या पद्धतीही प्रत्येकजण सोईनुसार ठरवतो . यामुळे असे म्हणता येईल की,प्रत्येक घटनेस प्रतिसाद देण्याचे व्यक्तीपरत्वे वैशिष्ट्य वेगवेगळे असते ज्याद्वारे ज्ञान ग्रहण करून त्याचा वापर प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला जातो . या प्रवृत्ती किंवा वैशिष्ट्यालाच त्या व्यक्तीची **अध्ययन शैली** म्हणतात . प्रस्तुत संशोधनात डी . कोल्ब यांची प्रमाणित असलेली अध्ययन शैली शोधिकेचा वापर केला आहे .

❖ **डी . कोल्ब**(1984)- प्रत्येक विद्यार्थ्यात मूर्त अनुभव क्षमता विमर्शनात्मक निरिक्षण क्षमता अमूर्त संकल्पना निर्मिती क्षमता व कृतीयुक्त प्रयोगशीलता क्षमता हया विविधांगी असतात . त्यानुसार अध्ययन शैली विकसित होते . कोल्ब डेव्हीडच्या प्रायोगिक उपपत्तीने अध्ययनाची प्रतिमाने आणि अनुकुलन प्रक्रिया प्रस्थापित केली,ज्यामध्ये मानवी बौद्धीक संरचना आणि वाढ व विकासाच्या पाय-यांबद्दलही माहिती प्रस्थापित केली . त्यांनी अध्ययनाची चार पाय-यांमध्ये विभागणी केली . ती पुढीलप्रमाणे .

1. मूर्त अनुभव क्षमता (Concrete experience abilities)
2. विमर्शनात्मक निरीक्षण क्षमता (Reflective observation abilities)
3. अमूर्त संकल्पना निर्मिती (Abstract conceptualization abilities)
4. कृतीयुक्त प्रयोगशीलता क्षमता (Active experimentation abilities)
5.

कोल्ब यांनी पुढील आकृतीद्वारे अध्ययन शैली संकल्पना अधिक स्पष्ट केली आहे .



विद्यार्थ्यांने आपल्या अध्ययनात स्वःचा समावेश करावा. आपल्या अनुभवांचे निरीक्षण वेगवेगळया पैलूंमधून करावेत. आपल्या या अनुभवाचा उपयोग विविध संकल्पना निर्मितीसाठी करावा. व संकल्पनांमधून एक तर्कसंगत अशी उपपत्ती निर्माण करावी आणि या उपपत्तींचा वापर निर्णय घेतांना तसेच समस्या निराकरण करतांना करावा. हीच त्या विद्यार्थ्याची अध्ययन शैली होय.

यावरून असे लक्षात येते की,प्रत्येक विद्यार्थी हा अध्ययन करण्यासाठी विविध पद्धतींचा वापर करतो व ज्ञान आत्मसात करतो. जसे प्रत्यक्ष अनुभवातून,निरीक्षणातून, प्रयोगाद्वारे, गटात आंतरक्रिया करून, प्रसारमाध्यमांद्वारे माहिती आत्मसात करून, स्पर्शातून इत्यादी. म्हणजे ज्या पद्धतीने त्यास आकलन होईल त्या पद्धतीने तो घडणा-या घटनांना व येणा-या समस्येला सामोरे जातो. विद्यार्थ्याच्या या वैशिष्टयालाच **अध्ययन शैली** म्हणतात.

## ब. अभिवृत्ती संकल्पनाः

अभिवृत्ती हया माणसाच्या वर्तनाचे नियंत्रण करतात. विशिष्ट प्रसंगात विशिष्ट प्रकारे वागण्याची तयारी अभिवृत्तीमुळेच होते. त्यामुळे वर्तनाला विशिष्ट वळण लागते. शिक्षण ,संगित, चित्रकला ,खेळ, दैनंदिन घडणा-या घडामोडी इत्यादी संबंधी आपले काही अनुकूल किंवा प्रतिकूल ग्रह असतात. त्यादृष्टीने आपल्या प्रतिकिया अभिवृत्तीवर अवलंबून असतात. शिक्षण तज्ज्ञांनी व मानसशास्त्रज्ञांनी अभिवृत्ती बाबत केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**1. आलपोर्ट डी. डब्ल्यू.** – कोणत्याही प्रकारच्या वस्तूच्या व्यक्ती किंवा प्रसंगाच्या बाबतीत अनुभवामुळे बनलेली अनुकूल किंवा प्रतिकूल स्वरूपाची प्रतिकिया घडवून आणण्यास मानसिक आणि शारीरिक प्रभावतेची स्थिती म्हणजे अभिवृत्ती होय.

**2. थर्स्टन** –An attitude is the degree of positive or negative affect associated with some psychological object.

**3. डेव्हर जेम्स** – अभिवृत्ती म्हणजे एखादे मत रूची अथवा उद्देशाची एक स्थायी तत्परता किंवा प्रवृत्ती आहे. हया प्रवृत्ती एखादया विशेष प्रकारच्या अनुभवाची आशा किंवा उचित प्रतिकियेची तयारी दडलेली असते.

हया व्याख्यांवरून असा अर्थ स्पष्ट होतो की अभिवृत्ती ही एक मनाची स्थायी अवस्था किंवा प्रवृत्ती आहे. त्यात प्रतिकिया व्यक्त होते. तिचे अस्तित्व नित्य असुन ती व्यक्तीच्या दैनिक व्यवहाराला अर्थ प्राप्त करून देते. व्यक्तीचे हेतू पूर्ण करण्यास सहाय्य करते.

प्रस्तुत संशोधनातून शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांची शिक्षणाकडे बघण्याची अभिवृत्ती कोणत्या स्तरावरची आहे हे शोधून काढायचे आहे. त्यासाठी डॉ. चोपरा एस. एल. यांनी प्रमाणित केलेली शिक्षणाप्रती अभिवृत्ती मापिकेचा वापर केला आहे. ही मापिका उच्च विश्वसनीय व सप्रमाण आहे. अनेक मानसशास्त्रज्ञांनी व शिक्षणतज्ज्ञांनी सदर शिक्षणाप्रती अभिवृत्ती मापिकेचा संशोधनांतर्गत उपयोग केलेला आहे. डॉ. चोपरा एस. एल. यांनी अभिवृत्तीचे स्तर पुढीलप्रमाणे प्रतिपादीत केले आहेत.

1. जास्त अनुकुल (Most Favourable)
2. अनुकुल (Favourable)
3. तटस्थ (Neutral )
4. अनुकुल नाही (Unfavourable)
5. जास्त अनुकुल नाही (Most unfavourable)

## क. शैक्षणिक संपादनः

सध्याचे युग हे आधुनिक युग तांत्रिक युग म्हणून ओळखले जाते. ज्ञानाच्या अनेक नविन शाखा उघडत आहेत. या सर्व शाखांमध्ये जो विदयार्थी ज्ञान मिळवणार आहे तो संपादनासाठी चढाओढ करून जास्तीत जास्त गुण कसे मिळतील याचा विचार करतो. परीक्षेद्वारे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक संपादनाचे मूल्यमापन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्याच्या बोधात्मक विकास किती झाला हे समजते. शैक्षणिक संपादनाच्या या निरिक्षणावरून विशिष्ट विद्यार्थ्याच्या विशिष्ट क्षेत्रातील गुणवत्तेबाबत अंदाज करता येतो. काही संशोधनातून असे आढळले आहे की संपादन हे विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्व समायोजनावर अवलंबून असते. विशेषतः हया समायोजनात भावनिक ,सामाजिक व घरातील घटक महत्वाचे आहेत.

अशारितीने विद्यार्थी आपल्या विविध अध्ययन शैलींचा अध्ययनासाठी उपयोग करून वर्षभर मेहनत घेऊन विविध विषयांचा अभ्यास करून जी परीक्षा देतो त्यातून त्याचे गुणांच्या स्वरूपात मूल्यमापन केले जाते. त्यासच शैक्षणिक संपादन म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांनी पदवी परीक्षेस प्राप्त केलेल्या गुणांवरून शैक्षणिक संपादनाचा आढावा घेतलेला आहे. प्राप्त गुणांचे प्रमाणित गुणांत रूपांतर करून अध्ययन शैली, शिक्षणाप्रती अभिवृत्ती आणि शैक्षणिक संपादनाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

### 1.3 उद्दिष्टे

1. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैलींचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या व छात्राध्यापिकांच्या शैक्षणिक संपादनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

### 1.4 परिकल्पना

1. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या शैक्षणिक संपादनात अध्ययन शैलीनुसार लक्षणिय फरक नाही.
2. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्तीनुसार शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.
3. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण छात्राध्यापकांची अध्ययन शैली व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांत लक्षणिय सहसंबंध नाही.

### 1.5 चले

**स्वाश्रयी चल** - अध्ययन शैलीं व शिक्षणाप्रती अभिवृत्ती

**आश्रयी चल** - शैक्षणिक संपादन

### 1.6 संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनात जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांची अध्ययन शैली, शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांचा शैक्षणिक संपादनासंदर्भात तुलनात्मक अभ्यास करायचा असल्याने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचा समावेश येतो.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे महाराष्ट्राच्या पूर्व खानदेशातील जळगाव जिल्ह्यात आहे. या विद्यापीठांर्गत जळगाव, धुळे,नंदुरबार हे तीन (3) जिल्हे येतात. प्रस्तुत संशोधन हे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील तसेच सर्व महाराष्ट्रातील विद्यार्थ्यासाठी उपयुक्त आहे.

जळगाव जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात एकूण पंधरा (15) तालुक्यांचा समावेश आहे. एकूण तालुक्यामिळून जवळजवळ सोळा (16) शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. त्यांना उत्तम शिक्षक होण्याचे प्रशिक्षण दिले जाते. प्रत्येक महाविद्यालयात सरासरी सोळाशे (1600) छात्राध्यापक आहेत. हीच प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. सदर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांची अध्ययन शैली व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यातील विविध घटकांतील विविध पैलूंशी संबंधित अभ्यास ही संशोधनाची व्याप्ती आहे.

## 1.7 संशोधनाची मर्यादा

संशोधन समस्येची व्याप्ती खूप आहे. परंतू काही मर्यादांमुळे संपूर्ण कार्यक्षेत्रापर्यंत पोहचू शकत नाही. तसेच आवश्यक माहिती संकलित करण्यासही अडचणी येतात. म्हणूनच संशोधिकेने वेळ व श्रम यांची उपलब्धता विचारात घेता एकूण पंधरा शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपैकी चार महाविद्यालयांची निवड ही संभाव्यता नमुना निवड पद्धतीनुसार यादृच्छिक नमुना निवड प्रकारातील लॉटरी पद्धतीने केली. प्रत्येक महाविद्यालयातून सर्वसमावेशक नमुना येईल असा विचार करून छात्राध्यापकांची व छात्राध्यापिकांची निवड केली . त्यात एकूण **400** छात्राध्यापकांचा समावेश होता. पैकी **50%** छात्राध्यापक व **50%** छात्राध्यापकाची गुच्छ पद्धतीने निवड करून अध्ययन शैलीं व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांचा शैक्षणिक संपादनासंदर्भात तुलनात्मक अभ्यास केला. छात्राध्यापकांना केवळ कागद ,पेन्सिल व कसोटी देऊन समावेश केला. आणि सदर संशोधनातून येणारे निष्कर्ष हे फक्त त्या चार शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपुरतेच मर्यादीत आहे.

## 1.8 संशोधन कार्यपद्धती

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करून त्यातील तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला गेला आहे.

## 1.9 माहिती संकलीत करण्याची साधने –

प्रस्तुत संशोधनात छात्राध्यापकांची अध्ययन शैली शोधण्यासाठी डी. कोल्ब यांनी प्रमाणित केलेली अध्ययन शैली शोधिकेचा वापर केला आहे. तसेच शिक्षणाप्रती अभिवृत्ती शोधण्यासाठी डॉ. चोपरा एस. एल. यांनी प्रमाणित केलेली शिक्षणाप्रती अभिवृत्ती मापिकेचा वापर केला आहे. दोन्ही शोधिका हया उच्च विश्वसनीय व सप्रमाण आहेत. अनेक मानसशास्त्रज्ञांनी व शिक्षणतज्ज्ञांनी सदर अध्ययन शैली शोधिकेचा व शिक्षणाप्रती अभिवृत्ती मापिकेचा संशोधनांतर्गत उपयोग केलेला आहे.

## 1.10 सामग्री /माहिती विश्लेषण पद्धती व तंत्रे

प्रस्तुत संशोधनात छात्राध्यापकांची अध्ययन शैलीं व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांचा शैक्षणिक संपादनासंर्भात तुलनात्मक अभ्यास केला आहे. माहिती विश्लेषणात व्दिमार्गी प्रचरण विश्लेषण (ANOVA) कॉन्टीजंसी काय स्क्वेअर या तंत्राचा वापर केला आहे.

## 1.11 माहिती विश्लेषण

**उद्दिष्ट 1. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैलीं आणि शैक्षणिक संपादन यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.**

**सारणी क्र. 1.1**

| लिंग | अध्ययन शैली | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | एकदिश | बहुदिश | आत्मसात करणारे/री | समावेशक | |
| छात्राध्यापक | 56 | 60 | 35 | 49 | 200 |
| | **28%** | **30%** | **17.5%** | **24.5%** | |
| छात्राध्यापिका | 58 | 66 | 22 | 54 | 200 |
| | **29%** | **33%** | **11%** | **27%** | 400 |

निरीक्षणेः

1. एकदिश अध्ययन शैलीचे छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **28% व 29%** असुन फारसा फरक दिसत नाही
2. बहुदिश अध्ययन शैलीचे छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **30% व 33%** असुन बहुदिश अध्ययन शैलीच्या छात्राध्यापिका यांचे प्रमाण 3% ने जास्त आहे.
3. आत्मसात करणारे/री अध्ययन शैलीचे छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **17.5% व 11%** असुन छात्राध्यापकांचे प्रमाण छात्राध्यापिकांच्या तुलनेने 6.5% ने जास्त आहे.

4. समावेशक अध्ययन शैलीचे छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **24.5% व 27%** असुन छात्राध्यापिकांचे प्रमाण छात्राध्यापकांच्या तुलनेने **2.5%** ने जास्त आहे.

**उद्दिष्ट 2. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास करणे.**

**सारणी क्र.1.2**

| लिंग | शिक्षणाप्रती अभिवृत्ती | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | जास्त अनुकुल | अनुकुल | तटस्थ | अनुकुल नाही | |
| **छात्राध्यापक** | 20 | 165 | 10 | 05 | 200 |
| | **10%** | **82.5%** | **5%** | **2.5%** | |
| **छात्राध्यापिका** | 24 | 160 | 14 | 02 | 200 |
| | **12%** | **80%** | **7%** | **1%** | 400 |

**निरीक्षणेः**

1. शिक्षणाप्रती जास्त अनुकुल अभिवृत्ती असलेल्या छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **10% व 12%** असुन फारसा फरक दिसत नाही
2. शिक्षणाप्रती अनुकुल अभिवृत्ती असलेल्या छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **82.5% व 80%** असुन छात्राध्यापकांचे प्रमाण छात्राध्यापिकांच्या तुलनेने **2.5%** ने जास्त आहे.
3. शिक्षणाप्रती तटस्थ अभिवृत्ती असलेल्या छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **5% व 7%** असुन छात्राध्यापकांचे प्रमाण छात्राध्यापिकांच्या तुलनेने 2% ने कमी आहे.
4. शिक्षणाप्रती अनुकुल नाही अभिवृत्ती असलेल्या छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे प्रमाण अनुक्रमे **2.5% व 1 %** असुन छात्राध्यापकांचे प्रमाण छात्राध्यापिकांच्या तुलनेने 1.5% ने जास्त आहे.

**उद्दिष्ट 3. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या शैक्षणिक संपादनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.**

**सारणी क्र. 1.3**

| लिंग | शैक्षणिक संपादन मध्यमान | एकूण |
|---|---|---|
| **छात्राध्यापक** | 64 | 200 |
| **छात्राध्यापिका** | 71 | 200 |
| **एकूण** | | 400 |

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांच्या शैक्षणिक संपादनाचे मध्यमान अनुक्रमे 64 व 71 असुन छात्राध्यापिकांच्या शैक्षणिक संपादनाचे प्रमाण छात्राध्यापकांच्या तुलनेने 6 ने जास्त आहे.

**शून्य परिकल्पना 1.**

**जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैली व शैक्षणिक संपादन यांत लक्षणिय फरक नाही.**

सदर परिकल्पना पडताळणीसाठी अध्ययन शैलीनुसार शैक्षणिक संपादनाचे मध्यमान काढून व्दिमार्गी प्रचरण विश्लेषण (ANOVA) चा वापर केला.

**सारणी क्र. 1.4**
**लिंगानुसार अध्ययन शैलींचे मध्यमान**

| लिंग | अध्ययन शैली | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | एकदिश | बहुदिश | आत्मसात करणारे/री | समावेशक | |
| छात्राध्यापक | 56 | 60 | 35 | 49 | 200 |
| मध्यमान | **58** | **66** | **55** | **50** | |
| छात्राध्यापिका | 58 | 66 | 22 | 54 | 200 |
| मध्यमान | **63** | **78** | **48** | **60** | |

**सारणी क्र. 1.5**
**नमुन्यातील एकूण छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैली व शैक्षणिक संपादन यांतील फरकाचे प्रचरण विश्लेषण सारांश**

| प्रचरणाचे स्त्रोत | संपादन वर्गाची बेरीज | स्वाधीनता मात्रा | वर्गाचे सरासरी प्रमाण |
|---|---|---|---|
| ओळीतील फरक | **270.031** | 1(r-1) | 270.031(ssr/df) |
| स्तंभातील फरक | **945.194** | 3(c-1) | 315.065(ssc/df) |
| आंतरक्रियेतील फरक | **18382.60** | 3(r-1)(c-1) | 6114.19(ssrc/df) |
| परिस्थितीमुळे पडणारा फरक | **96846** | 392(N-rc) | 233.8(ssw/df) |

### विश्लेषण व अन्वयार्थ

प्राप्त 'F'=26.15 असुन 0.01 व 0.05 स्तरावरील किमतीपेक्षा जास्त आहे. म्हणजे 0.01 स्तरावर अध्ययन शैली व शैक्षणिक संपादन यांत लक्षणिय फरक लक्षणिय आहे. यावरून **'जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैली व शैक्षणिक संपादन यांत लक्षणिय फरक नाही'** या शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

### शून्य परिकल्पना 2.

**जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्तीनुसार शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.**

सदर परिकल्पना पडताळणीसाठी शिक्षणाप्रती अभिवृत्तीनुसार शैक्षणिक संपादनाचे मध्यमान काढून व्दिमार्गी प्रचरण विश्लेषण (ANOVA) चा वापर केला.

### सारणी क्र. 1.6
### लिंगानुसार शिक्षणाप्रती अभिवृत्तीचे मध्यमान

| लिंग | शिक्षणाप्रती अभिवृत्ती | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | जास्त अनुकुल | अनुकुल | तटस्थ | अनुकुल नाही | |
| छात्राध्यापक | 20 | 165 | 10 | 05 | 200 |
| **मध्यमान** | **54** | **72** | **26** | **45** | |
| छात्राध्यापिका | 24 | 160 | 14 | 02 | 200 |
| **मध्यमान** | **68** | **78** | **40** | **57** | |

### सारणी क्र. 1.7
### नमुन्यातील एकूण छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्ती व शैक्षणिक संपादन यांतील फरकाचे प्रचरण विश्लेषण सारांश

| प्रचरणाचे स्त्रोत | संपादन वर्गाची बेरीज | स्वाधीनता मात्रा | वर्गाचे सरासरी प्रमाण |
|---|---|---|---|
| ओळीतील फरक | **300.030** | 1(r-1) | 300.030(ssr/df) |
| स्तंभातील फरक | **1045.194** | 3(c-1) | 348.398(ssc/df) |
| आंतरक्रियेतील फरक | **18382.60** | 3(r-1)(c-1) | 6127.53(ssrc/df) |
| परिस्थितीमुळे पडणारा फरक | **88846** | 392(N-rc) | 226.65(ssw/df) |

### अन्वयार्थ

प्राप्त 'F'=27.03 असुन ही 0.01 व 0.05 स्तरावरील किमतीपेक्षा जास्त आहे. म्हणजे 0.01 स्तरावर शिक्षणाप्रती अभिवृत्ती व शैक्षणिक संपादन यांत लक्षणिय फरक लक्षणिय आहे. यावरून **'जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्तीनुसार शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही'**या शून्य परिकल्पनेचा त्याग केला.

### शून्य परिकल्पना 3.

**जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण छात्राध्यापकांची अध्ययन शैली व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांत लक्षणिय सहसंबंध नाही.**

सदर परिकल्पना पडताळणीसाठी काय स्क्वेअरचा वापर केला.

### सारणी क्र. 1.8
### नमुन्यातील एकूण छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैली व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांतील सहसंबंध दर्शवणारे 4*4कॉन्टीजन्सी कोष्टक

| अध्ययन शैली | शिक्षणाप्रती अभिवृत्ती | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | जास्त अनुकुल | अनुकुल | तटस्थ | अनुकुल नाही | |
| **एकदिश** | 09 | 19 | 03 | 03 | **34** |
| स्वतंत्रता मूल्य | **29.445** | **32.487** | **19.114** | **19.114** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **बहुदिश** | 18 | 157 | 08 | 06 | **189** |
| स्वतंत्रतामूल्य | **31.287** | **128.535** | **24.321** | **22.100** | |
| **आत्मसात करणारे** | 05 | 66 | 03 | 02 | **76** |
| स्वतंत्रतामूल्य | **22.145** | **56.241** | **19.114** | **16.002** | |
| **समावेशक** | 02 | 97 | 01 | 01 | **101** |
| स्वतंत्रतामूल्य | **13.211** | **78.321** | **11.121** | **11.121** | |
| **एकूण** | **34** | **339** | **15** | **12** | **400** |

**C=0.154, (X2)=10.247**

## अन्वयार्थ

प्राप्त"()" 10.25 असुन ही किंमत 0.01 व 0.05 स्तरावरील किमतीपेक्षा कमी आहे. म्हणजे शिक्षणाप्रती अभिवृत्ती व शैक्षणिक संपादन यांत लक्षणिय सहसंबंध नाही. यावरून '**जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण छात्राध्यापकांची अध्ययन शैली व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांत लक्षणिय सहसंबंध नाही**.'या शून्य परिकल्पनेचा स्विकार केला.

## 1.12 निष्कर्ष ः

1. एकदिश, बहुदिश व समावेशक अध्ययन शैलीच्या तुलनेत आत्मसात करणारे अध्ययन शैलीचे छात्राध्यापक व छात्राध्यापिकांचे प्रमाण कमी आहे.
2. शिक्षणाप्रती अनुकुल अभिवृत्तीच्या तुलनेत , जास्त अनुकुल ,तटस्थ व अनुकुल नाही अभिवृत्तीच्या छात्राध्यापक व छात्राध्यापिकांचे प्रमाण कमी आहे.
3. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची अध्ययन शैली व शैक्षणिक संपादन यांत लक्षणिय फरक आहे.
4. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची शिक्षणाप्रती अभिवृत्तीनुसार शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक आहे.
5. जळगाव जिल्ह्याच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण छात्राध्यापकांची अध्ययन शैली व शिक्षणाप्रती अभिवृत्ती यांत लक्षणिय सहसंबंध नाही.

## संदर्भसूची


- Agarwal, S.C. (1985).Learning Styles Variations At Different Levels.New Delhi: Indian Educational Review, NCERT, Vol 20 (2).
- Barbara, K. (1996). Learning Styles, A Synthesized Model, New Delhi: Journal Of Accelerated Learning And Teaching.Vol 21(1, 2).
- Best, J, Kahn, J. (2007).Research In Education, New Delhi: Prentice Hall Of India Pvt. Ltd.
- Buch, M.B. (1992).First To Fifth Survey of Research In Education, New Delhi.
- Du and Simpon.(2005).Relationship Between Learning Styles,Class Participation And Student's Enjoyment Level. New Delhi: Indian Journal Of open Learning, IGNOU, Vol 14 (1).
- Mark, L. (2001). Teaching Learning And Learning Teaching:An Introduction To Learning Styles. New Delhi: New Frontiers In Education.Vol 21 (4).
- Orr-Kay,L.(2002). The Effects Of Group Computer Based Instruction And Learning Style On Achievement And Attitude,ERIC..
- Sharma,S.(1993).A Study Of The Attitude Of Teachers And Parents Of Rural And Towards Population Education.Unpublished Thesis.Nagpur Univ.

- **Other Sources :**
- Center for Development of Teaching and Learning (CTDL) Brief, Sept.2002, Vol.No.5, page no.1-2.
- ERIC,Data,The Centre For Research On Learning & Teaching- Occasional Paper,2004.
- International Journal,Educational Technology & Society, Vol.No. 9 (1), page no. 289- 297, 2006.
- In Eurasia Journal of Mathematics, Science & Technology
- Education, 2008, Vol.No. **4**(1), page no .21-26.
- Internatonal Journal Of Special Education , Vol.21 (2), 2006
- Educational Research & Reviews, 2010, Vol.No. **5**(12), Page no .758-769
- International Refereed Research Journal www.researchersworlld. Com,Vol.No. 2(1), January, 2011, page no . 103-109.
- मराठी पुस्तके
- दांडेकर , वा . ना . **(2002)**. शैक्षणिक व सामाजिक मानसशास्त्र . पुणे ः श्रीविदया प्रकाशन .
- महाले एस . आर . **(2005)**. अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययन शैली . औरंगाबाद ः युनिक प्रकाशन .





डॉ . जगताप मनिषा वसंतराव

सहा . प्राध्या : आयडीयल विभाग,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ,जि . जळगाव .